नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd
अंक - १३३ | Issue - 133
वार रविवार दि. २९ सप्टेंबर २०२४ | Blow- Sunday Date 29 September 2024
ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com
वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com
पाने - ४ | Pages - 4
किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs
ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

## विधानसभा निवडणूक प्रक्रिया २६ नोव्हेंबरपूर्वी पूर्ण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : एकाच ठिकाणी तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केलेल्या किंवा मूळ जिल्ह्यात निवडणूक कामाशी संबंधित पदावर असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्यांसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्य सरकारला सोमवारपर्यंत मुदत दिली आहे. निवडणूक आयोगाच्या कोणत्याही नियमाला बगल दिली जाणार नाही किंवा कोणाचाही अपवाद करता येणार नाही, असे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी पत्रकार परिषदेत शनिवारी येथे सांगितले.

नियमानुसार आवश्यक असलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असल्याबाबत मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालकांचा अहवाल अद्याप आयोगाकडे नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबरला संपत असून त्यापूर्वी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. प्रत्येक मतदान केंद्रावर झालेल्या मतदानाची आकडेवारी (अर्ज १७ सी) उमेदवारांच्या निवडणूक प्रतिनिधींना दिली जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

राजीव कुमार, निवडणूक आयुक्त ग्यानेश कुमार आणि सुखविंदरसिंग संधू यांनी दोन दिवसात राजकीय पक्ष, मुख्य सचिव आणि पोलिस महासंचालक, विभागीय आयुक्त, महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक आणि निवडणूक अधिकारी यांच्या बैठका घेऊन विधानसभा निवडणूक तयारीचा आढावा घेतला .



आयोगाच्या निकषांनुसार कार्यकाळ पूर्ण केलेल्या किंवा मूळ जिल्ह्यांमध्ये नियुक्ती असलेल्या निवडणूक कामाशी संबंधित अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याचे आदेश ऑगस्टमध्ये देवूनही आणि स्मरणपत्रे पाठवूनही त्याचे पालन न झाल्याबद्दल आयोगाने मुख्य सचिव, पोलीस महासंचालकांकडे तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. यासंदर्भात पत्रकारपरिषदेत विचारले असता राजीव कुमार म्हणाले, एकाच पदावरील तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झालेले अधिकारी, सेवानिवृत्त अधिकाऱ्याला देण्यात आलेली मुदतवाढ किंवा कंत्राटी नियुक्ती, मूळ गाव असलेल्या जिल्ह्यात नियुक्त असलेले अधिकारी आदींबाबत निवडणूक आयोगाचे नियम स्वयंस्पष्ट आहेत. त्यांचे काटेकोरपणे पालन केले जाईल आणि कोणाचाही अपवाद केला जाणार नाही.

मतदान दिवाळी, देवदिवाळी, छटपूजा काळात आणि आठवड्याच्या शेवटी न घेता मंगळवार, बुधवार, गुरुवारी घ्यावे, अशी मागणी राजकीय पक्षांनी केली आहे. ती योग्यच असून त्यावर विचार होईल. निवडणूक एकाच टप्प्यात घेण्याची मागणी काही राजकीय पक्षांनी केली असल्याबाबत आयोगाने दुजोरा दिला, मात्र त्यावर कोणतेही मत व्यक्त केले नाही. (पान २ वर...)

## दहशतवादाचे परिणाम भोगावे लागतील!




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी शुक्रवारी संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेमध्ये काश्मीर आणि अनुच्छेद ३७०चा मुद्दा उपस्थित केल्यानंतर भारताने शुक्रवारी सडेतोड उत्तर दिले. भारताविरोधात सीमापार दहशतवादाचे परिणाम आपल्याला भोगावे लागतील हे पाकिस्तानने समजून घ्यावे अशा कठोर शब्दांमध्ये संयुक्त राष्ट्रातील भारताच्या स्थायी मिशनच्या प्रथम सरचिटणीस भाविका मंगलआनंदन यांनी पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांना सुनावले. जगभरात होणाऱ्या दहशतवादी हल्ल्यांमध्ये पाकिस्तानच्या बोटांचे ठसे सापडतील असेही त्या म्हणाल्या.

आमसभेच्या ७९व्या सत्रामध्ये शाहबाज शरीफ यांनी शुक्रवारी सकाळी आपल्या भाषणादरम्यान काश्मीरचा मुद्दा उपस्थित केला. त्याला उत्तर देण्याच्या अधिकाराअंतर्गत मंगलआनंदन यांनी भारताची भूमिका स्पष्ट केली. ''लष्कराची सत्ता असलेला देश - ज्याला जगभरात दहशतवाद, अंमली पदार्थांचा व्यापार आणि आंतरराष्ट्रीय गुन्ह्यांसाठी ओळखले जाते, त्यांनी जगातील सर्वात मोठी लोकशाहीवर टीका करण्याचे औद्धत्य दाखवले.

### संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत भारताचे पाकिस्तानला सडेतोड उत्तर

पाकिस्तानने दीर्घकाळापासून आपल्या शेजाऱ्यांविरोधात दहशतवादाचा शस्त्रासारखा वापर केला आहे हे जगाला माहित आहे.'' मंगलआनंदन यांनी यावेळी संसद आणि मुंबईवरील पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादी हल्ल्यांचाही उल्लेख केला. अशा देशाने कुठेही हिंसाचाराबद्दल बोलणे हा दांभिकपणा आहे अशी टीका भारताने केली. शरीफ यांनी शुक्रवारी भाषण करताना, अपेक्षेप्रमाणे काश्मीरचा मुद्दा उपस्थित केला होता. भारताने काश्मीरमध्ये अनुच्छेद ३७० पुन्हा लागू करावे आणि शांततेसाठी चर्चा करावी असे ते म्हणाले होते.

## थोडक्यात

### हवाई हल्ल्यात दहशतवादी हसन नसराल्लाहचा खात्मा

दिल्ली : इस्रायलने हेजबोलावर सर्वात मोठा घाव केला आहे. इस्रायलच्या हल्ल्यात हेजबोलाचा म्होरक्या हसन नसरल्लाह याचा खात्मा करण्यात आला आहे ही माहिती समोर आली आहे. इस्रायली लष्कर खऊफ्र ने याला दुजोरा दिला आहे. आता नसराल्लाह जगाला घाबरवू शकणार नाही, असं देखील इस्रायलने म्हटलं आहे. खऊफ्र ने म्हटलं की, इस्रायल लष्कराने नसरल्लाहसह हेजबोलाच्या अतिरिक्त कमांडर्सना देखील ठार केलं. यापूर्वी इस्रायली लष्कराने दावा केला होता की, त्यांनी लेबनॉनमध्ये हवाई हल्ल्यांदरम्यान अनेक हेजबोला कमांडर मारले आहेत. नसराल्लाहच्या मृत्यूला लेबनॉन आणि हेजबोला यांनी अद्याप दुजोरा दिलेला नाही. नसराल्लाहच्या मृत्यूची पुष्टी करत इस्रायली आर्मी आयडीएफने ट्विटरवर पोस्ट केले, 'हसन नसराल्लाह यापुढे जगात दहशत माजवू शकणार नाही.'

### बांगलादेशातील हिंदू नवीन पक्षाच्या विचारात

ढाका : बांगलादेशातील हिंदू समुदायाचे नेते एक राजकीय पक्ष स्थापन करण्याचा विचार करीत आहेत. हिंदूंच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांची सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी राजकीय प्रतिनिधित्वाचे आवाहनही केले जात आहे. बांगलादेश हिंदू बौद्ध ख्रिश्चन युनिटी कौन्सिल (बीएचबीसीओपी) आणि इतर गटांच्या हिंदू नेत्यांनी या राजकीय पक्षाचा प्रस्ताव मांडला असून; पक्ष किंवा संसदीय जागांची मागणी करण्याच्या शक्यतेवरही हे नेते चर्चा करीत आहेत.

## केंद्रीय गुप्तचर यंत्रणेकडून संभाव्य घातपाताबद्दल राज्याला अलर्ट!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : केंद्रीय गुप्तचर यंत्रणेने वर्तवलेल्या संभाव्य धोक्याची काळजी घेत मुंबई पोलिसांनी संपूर्ण शहरात विशेषतः गर्दीच्या आणि संवेदनशील भागात सुरक्षा वाढवली आहे. नवरात्री दुर्गापूजा, दिवाळी सण अवघ्या काही दिवसांवर आला आहे. अशातच महाराष्ट्र विधानसभेची सुद्धा लगबग वाढली आहे. याच सगळ्या बाबीच्या दृष्टीने निवडणुकांपूर्वी शहरात सुरक्षा वाढवण्यात आली आहे. विशेषत: सार्वजनिक ठिकाणे, धार्मिक स्थळे, पर्यटन स्थळे आणि इतर महत्त्वाच्या ठिकाणी दक्ष राहण्याच्या सूचना पोलिसांना देण्यात आल्या आहेत. शहरात असणाऱ्या वाहनांच्या हालचालींवर सुद्धा पाळत ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. दक्षिण मुंबईतील अल्पसंख्याक बहुल भागात पोलिसांकडून मॉक ड्रिल घेण्यात आले आहे. समुद्रकिनाऱ्यांसह काही महत्त्वाची गर्दीच्या ठिकाणी आणि सार्वजनिक ठिकाणी पोलिसांची संख्या वाढली आहे.

प्रमुख धार्मिक स्थळांना, विशेषत: मंदिरांना अंतर्गत आणि बाह्य सुरक्षा देण्याचा सल्ला गुप्तचर यंत्रणेने दिला आहे. शहरातील प्रत्येक झोनल पोलिस उपायुक्तांना त्यांच्या कार्यक्षेत्रात संशयास्पद हालचाली आढळल्यास करडी नजर ठेवण्याचे काम देण्यात आले आहे. शहरात वाढलेली सुरक्षा पूर्णपणे सावधगिरीच्या हेतूने वाढवण्यात आली आहे. अलीकडे, एका राजकीय पक्षाने चर्चगेटजवळील राज्य सरकारच्या मुख्यालयाबाहेर आंदोलन केले तेव्हा कायदा सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला होता. याशिवाय एका मानसिक अस्वस्थ झालेल्या महिलेने उच्च सुरक्षा असलेल्या मंत्रालयात घुसून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयाची तोडफोड करण्याचा प्रयत्न केला.



आगामी निवडणुका आणि राज्यातील सणासुदीच्या पार्श्वभूमीवर राज्यसरकारने सुद्धा सुरक्षा वाढवली आहे. तसेच विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात सुद्धा खबरदारीच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

## मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांनी पुत्र उदयनिधींकडे दिली उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चेन्नई: तामिळनाडू सरकारमधील मंत्रिमंडळात मोठा फेरबदल झाला आहे. मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांनी राज्यपालांची भेट घेऊन पुत्र उदयनिधी स्टॅलिन यांची उपमुख्यमंत्रीपदी नियुक्ती करण्याची शिफारस केली आहे. राज्यपालांनी या शिफारसी मान्य केल्या असून उद्या २९ सप्टेंबर रोजी दुपारी साडे तीन वाजता चेन्नईच्या राजभवनात उदयनिधी यांचा शपथविधी होणार आहे.



मंगळवारी मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी उदयनिधी यांना उपमुख्यमंत्री केले जाऊ शकते असे संकेत दिले होते. तसेच त्यांनी मंत्रिमंडळात देखील बदल होऊ शकतात असे म्हटले होते. तामिळनाडू सरकारमधील हा बदल राज्याच्या दृष्टीने एक मोठी घटना मानली जात आहे. या निर्णयामुळे तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन यांचे पुत्र उदयनिधी यांचे नेतृत्व आणखी मजबूत होईल. तसेच या नियुक्तीमुळे स्टॅलिन यांनी आपला उत्तराधिकारी देखील निश्चित केल्याचे स्पष्ट होत आहे. यामुळे लोकांच्यात देखील हा संदेश जाईल की, स्टॅलिन यांचा उत्तराधिकारी उदयनिधी हेच असतील. राज्यातील पुढील विधानसभा निवडणुकीच्या आधी पक्षावर पकड मजबूत करण्याच्या रणनितीच्या भाग म्हणून याकडे पाहिले जात आहे. उदयनिधी यांना उपमुख्यमंत्री करण्यासोबत मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी व्ही.सेंथिल बालाजी, डॉ.गोवी.चेझियान, आर राजेंद्रन, थिरु एनएम नासर यांचा मंत्रिमंडळात समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे.

### लाडकी बहीण योजनेबाबत राज ठाकरेंचं भाष्य

## राज्य खड्ड्यात घातलं जात असेल तर हे चुकीचं आहे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना सध्या चांगलीच चर्चेत आहे. लाडकी बहीण योजनेवरुन विरोधकांनी सातत्याने सरकारवर टीका केली आहे. या योजनेच्या अंतर्गत पात्र महिलांना महिन्याचे १५०० रुपये दिले जातात. सरकारकडून मतांसाठी ही लाच दिली जाते आहे अशी टीका संजय राऊत यांनी केली आहे. तसंच उद्धव ठाकरे, शरद पवार, प्रणिती शिंदे, नाना पटोले यांनीही आत्तापर्यंत अनेकदा या लाडकी बहीण योजनेवरुन महायुतीवर टीका केली आहे.



आता राज ठाकरे यांनी पत्रकारांशी अनौपचारिक चर्चा करताना लाडकी बहीण योजनेवरुन टीका केली आहे.

अमरावतीत पत्रकारांशी अनौपचारिक गप्पा मारताना राज ठाकरे यांनी लाडकी बहीण योजनेवर भाष्य केलं. जानेवारीत पगार द्यायला सरकारच्या तिजोरीत पैसे राहणार नाहीत' असं राज ठाकरे म्हणाले.राज्य खड्ड्यात घातलं जात असेल तर ते चुकीचं आहे. महिलांना अशा प्रकारे पैसे न देता राज्यात नवीन उद्योग आणा असं म्हणत राज ठाकरेंनी या योजनेवर अप्रत्यक्षरित्या टीका केली आहे.

### विरोधकांचा संविधान बदलण्याचा मुद्दा चालणार नाही — केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

## हरीयाणामध्ये तिसऱ्यांदा भाजपचे बहुमताने सरकार येणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोनिपत : प्रधानमंत्री नरेंद्र मोदि यांनी प्रधानमंत्रीपदाची हॅट्रीक केली आहे.त्याचप्रमाणे हरीयाणा मध्ये भाजप सरकार तिसऱ्यांदा बहुमताने निवडुन येईल.हरीयाणातीळ सर्व ९० जागांवर रिपब्लिकन पक्षाने भाजपला पाठिंबा दिला आहे.हरीयाणातील दलित जनता भाजपला कौल देणार असल्यामुळे हरीयाणात तिसऱ्यांदा भाजपचे बहुमताने सरकार येईल असा विश्वास रिपब्लिकन पक्षाने राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रिय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केला.

हरियाणा विधानसभा निवडणुकीत गनौरचे भाजप उमेदवार देवेंद्र कौशिक यांच्या प्रचारार्थ रामलिला मैदानावर आयोजित जाहिर सभेत ना.रामदास आठवले बोलत होते. यावेळी




रिपब्लिकन पक्षाचे प्रदेशअध्यक्ष रवि ऊर्फ सोनु कुंडली,माजी खासदार रमेश कौशिक,आमदार श्रीमती निर्मला चौधरी,अरूण त्यांगी,मनिष, मनोज सिंधीया आदी मान्यवर उपस्थित होते.

लोकसभा निवडणुकीत संविधान आणि आरक्षणाच्या मुद्यावर काँग्रेस आणि विरोधकांनी भाजपवर खोटे आरोप केले होते.त्यामुळे लोकसभा निवडणुकीत भाजपचे काही प्रमाणात नुकसान झाले.

संविधान आणि आरक्षणाच्या मुद्यावर काँग्रेसने केलेले आरोप हे खोटे आरोप होते हे आता सिध्द झाले आहे.त्यामुळे विधानसभा निवडणुकीत विरोधकांचा संविधान बदलण्याचा मुद्दा चालणार नाही.

आरक्षणा बाबत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आरक्षण संपवण्याचे केलेल्या व्यक्तव्यामुळे दलितांमध्ये त्यांच्या विरुध्द तीव्र संताप आहे. त्यामुळे हरियाणा मधील दलित जनता भाजपच्या पाठिशी ठामपणे उभी आहे. या विधानसभा निवडणुकीत हरीयाणात भाजपचे सरकार तिसऱ्यांदा निवडून येईल.असे ना.रामदास आठवले यावेळी म्हणाले.

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे संविधान मजबुत करीत आहेत.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांबद्दल मोदींना प्रेम आहे.काँग्रेसने वर्षानुवर्ष भावनिक करुन दलितांची फसवणुक केली आहे. आरक्षण संपवण्याची भाषा करणाऱ्या राहुल गांधी आणि त्यांच्या काँग्रेसला दलित जनता विधानसभा निवडणूकीत धडा शिकवणार आहे. रिपब्लिकन पक्षाने हरीयाणातील सर्व जांगावर भाजपला पाठिंबा दिला असल्याने येथील जनता विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा धुवा उडवेल असा विश्वास ना.रामदास आठवले यावेळी व्यक्त केला.**

## अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांच्या अडचणीत वाढ, निवडणूक रोखेसंदर्भात गुन्हा दाखल!



नवी दिल्ली : बेंगळुरू पोलिसांनी शनिवारी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण, अंमलबजावणी संचालनालय अधिकारी आणि काही भाजपा नेत्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. रद्द केलेल्या निवडणूक रोख्यांच्या योजनेशी संबंधित तक्रारीच्या संदर्भात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

विशेष न्यायालयाच्या निर्देशानुसार कलम ३८४ (खंडणीसाठी शिक्षा) आणि १२०बी (गुन्हेगारी कट) अंतर्गत एफआयआर नोंदवण्यात आला. 'जनाधिकार संघर्ष परिषद' चे सह-अध्यक्ष आदर्श आर अय्यर यांनी दाखल केलेल्या तक्रारीत कर्नाटक भाजपाचे प्रमुख आणि बी एस येडियुरप्पा यांचा मुलगा बी वाय विजयेंद्र आणि पक्षाचे नेते नलिंकुमार कटील यांचाही समावेश आहे. पीटीआय या वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार तक्रारदाराने आरोप केला आहे की, आरोपींनी निवडणूक रोख्यांच्या नावाखाली खंडणी उकळली आणि आठ हजारांहून अधिक कोटी रुपयांचा फायदा करून घेतला. जनाधिकार संघर्ष परिषदेचे आदर्श अय्यर यांनी अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांच्याविरोधात बेंगळुरूमध्ये तक्रार दाखल केली होती. तसेच निर्मला सीतारमण यांच्याविरोधात कारवाई करण्याची मागणी केली होती.

## संपादकीय....

# सतर्कतेचा इशारा

नवरात्री दुर्गापूजा, दिवाळी सण अवघ्या काही दिवसांवर आला आहे. अशातच महाराष्ट्र विधानसभेची सुद्धा लगबग वाढली आहे. याच सगळ्या बाबीच्या दृष्टीने निवडणुकांपूर्वी शहरात सुरक्षा वाढवण्यात आली आहे. विशेषत: सार्वजनिक ठिकाणे, धार्मिक स्थळे, पर्यटन स्थळे आणि इतर महत्त्वाच्या ठिकाणी दक्ष राहण्याच्या सूचना पोलिसांना देण्यात आल्या आहेत. शहरात असणाऱ्या वाहनांच्या हालचालींवर सुद्धा पाळत ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. दक्षिण मुंबईतील अल्पसंख्याक बहुल भागात पोलिसांकडून मॉक ड्रिल घेण्यात आले आहे. समुद्रकिनाऱ्यांसह काही महत्त्वाची गर्दीच्या ठिकाणी आणि सार्वजनिक ठिकाणी पोलिसांची संख्या वाढली आहे. प्रमुख धार्मिक स्थळांना, विशेषत: मंदिरांना अंतर्गत आणि बाह्य सुरक्षा देण्याचा सल्ला गुप्तचर यंत्रणेने दिला आहे. शहरातील प्रत्येक झोनल पोलिस उपायुक्तांना त्यांच्या कार्यक्षेत्रात संशयास्पद हालचाली आढळल्यास करडी नजर ठेवण्याचे काम देण्यात आले आहे. शहरात वाढलेली सुरक्षा पूर्णपणे सावधगिरीच्या हेतूने वाढवण्यात आली आहे. अलीकडे, एका राजकीय पक्षाने चर्चगेटजवळील राज्य सरकारच्या मुख्यालयाबाहेर आंदोलन केले तेव्हा कायदा सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला होता. याशिवाय एका मानसिक अस्वस्थ झालेल्या महिलेने उच्च सुरक्षा असलेल्या मंत्रालयात घुसून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयाची तोडफोड करण्याचा प्रयत्न केला. विरोधी महाविकास आघाडी सत्ताधारी महायुती सरकारच्या विरोधात आक्रमक पवित्रा घेत मैदानात उतरल्याचे दिसत आहे. महायुती सरकारच्या काळात राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे बिघडल्याचा विरोधक आरोप करत आहे. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजीनाम्याची सुद्धा मागणी विरोधकांकडून होत आहे. महाविकास आघाडी आणि आम आदमी पक्षाने भारतीय निवडणूक आयोगाने कडे मागणी केली आहे की, विधानसभा निवडणुका मुक्त आणि निष्पक्ष व्हाव्यात यासाठी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांना त्वरित हटवावे असे निवेदन दिले आहे.महाराष्ट्र काँग्रेसने याच मुद्द्यावर भारतीय निवडणूक आयोगाने आणि राज्य निवडणूक मंडळाला दोन निवेदन सादर केले आहे, परंतु अद्याप अधिकाऱ्यांकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. आगामी निवडणुका आणि राज्यातील सणासुदीच्या पार्श्वभूमीवर राज्यसरकारने सुद्धा सुरक्षा वाढवली आहे. तसेच विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात सुद्धा खबरदारीच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

# विधानसभा निवडणूक प्रक्रिया २६ नोव्हेंबरपूर्वी पूर्ण

(पान १ वरून..) लोकसभा निवडणुकीच्या काळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रचारासाठी गेले असताना यांच्या हेलिकॉप्टरची तपासणी करण्यात आली नाही व पैशांच्या बॅगा नेण्यात आल्याचा आरोप झाला होता. त्याचबरोबर राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या तुतारीची साधर्म्य असलेले पिपाणी चिन्ह अन्य उमेदवाराला दिल्याने पवार गटाला फटका बसला, आदींबाबच विचारता राजीव कुमार म्हणाले, सुरक्षिततेच्या कारणांसाठी अपवाद करण्यात आलेल्या अतिमहत्त्वाच्या व्यक्ती सोडून अन्य मंत्री व राजकीय नेत्यांच्या हेलिकॉप्टरची तपासणी करण्याचे आयोगाचे आदेश आहेत. त्याची काटेकोर अंमलबजावणी होईल.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांना निवडणूक चिन्हे देण्यात आली असून आयोगाने आधीच आदेश जारी केले आहेत व हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. राज्याच्या सीमांवर तपासणी नाके उभारून दारू, अमली पदार्थ व पैशांची रोखण्यात यावी, असे आदेश सीमाशुल्क, अबकारी, पोलीस आणि अन्य यंत्रणांना देण्यात आले आहेत.

# मन व शरीर साथ असेल तर हृदय शाबूत!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जगभरात जागतिक हृदय दिन हा दरवर्षी २९ सप्टेंबर रोजी साजरा होत असतो. हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोगांबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी आणि या आजारांचा जागतिक प्रभाव कमी करण्यासाठीच्या धोरणांना प्रोत्साहन देण्यासाठी तो साजरा केला जातो. हृदयाच्या आरोग्याबाबत लोकांना जागरूक करणे हा 'जागतिक हृदय दिना' चा मुख्य उद्देश आहे. काही वर्षांपासून हृदयविकारासंदर्भातील आजारांमध्ये लक्षणीयरीत्या वाढ झाली असून अवघ्या तिशीत तरुणांनाही हृदयविकाराचा त्रास होऊ लागला आहे. बदलती जीवनशैली, अयोग्य आहार पद्धती, वाढता ताणतणाव, मद्यपान, तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन ही प्रमुख कारणे यामागे असल्याचे तज्ज्ञांनी सांगितली. तरुणांनी हृदयविकाराला दूर ठेवण्यासाठी या बाबी टाळण्याचा सल्लाही त्यांनी दिला आहे. कोणत्याही प्रकारच्या हार्ट-मॅजिक औषधांचा वापर करण्यापूर्वी त्याची खरंच आवश्यकता आहे का हेदखील तपासून पाहणे आवश्यक आहे.



भारतात वाढत्या हृदय रोगाचे प्रमाण हे निश्चितच धोक्याची सुचना आहे. जर योग्य काळजी घेतली तर आपण हृदयरोगास निश्चितच टाळू शकतो. मात्र त्यासाठी प्रतिबंधात्मक नियम पाळणे आवश्यक आहे. हृदयविकाराचे प्रमाण आणि त्यास कसे टाळावे, यासंबंधी जाणून घेण्याचा प्रयत्न करू या. भारतात हृदयविकाराचे प्रमाण बघितले तर प्रत्येक ३३ सेकंदाला एक व्यक्ती हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यु पावतो. शिवाय मधूमेहाचे सर्वाधिक रुग्ण भारतात आहेत व प्रत्येक मधूमेह रुग्णास हृदयविकार असल्याचे गृहित धरतेच. एकूणच जगभरातील सर्वाधिक हृदयविकाराचे रुग्ण भारतात आहेत. आणखी एक बाब म्हणजे भारतीयांना नैसर्गिकरीत्याच हृदयविकाराची जोखिम आहे; कारण आपल्या रक्तवाहिन्यांचा आकार पाश्चिमात्यांच्या तुलनेत छोटा आहे. शिवाय हृदयाच्या एकाहून अधिक रक्तवाहिन्यांमध्ये ब्लॉकेज निर्माण होण्याचे प्रमाणही अधिक आहे. दुसरं म्हणजे वाढती लोकसंख्या व त्यामुळे निर्माण झालेली स्पर्धा, ताणतणाव, बदलती जीवनशैली आणि प्रदुषण देखील हृदयविकाराला पुरक ठरत आहेत. दहा वर्षापूर्वी चाळीशीच्या खालील एखाद दुसऱ्या रुग्ण हृदयविकाराच्या झटक्याने इस्पितळात भरती व्हायचा. आता मात्र, शंभरातील ३० रुग्ण हे हमखास चाळीशीच्या खालील असतात.

आपण बघितलं की, आपल्याला हृदयरोगाची अधिक जोखिम आहे. त्यामुळे आपण हृदयरोग टाळण्यासाठी निश्चितच प्रयत्न केला पाहिजे. पण हृदयरोगाला टाळू शकणार नाही असे दोन घटक असतात, ते म्हणजे वय व अनुवांशिकता, या जोखिमा टाळता येणे शक्य नाही. पण जसे जसे वय वाढते किंवा अनुवांशिक दृष्टीने हृदयविकाराची संभावना असल्याचे लक्षात आले, तर टाळता येण्यायोग्य घटकांवर कार्य केले पाहिजे. टाळण्यायोग्य घटकांमध्ये रक्तदाब व मधूमेह, धुम्रपान व बैठी जीवनशैली आणि लठ्ठपणा व उच्च कोलेस्ट्रॉलची मात्रा या बाबींचा समावेश होतो. योग्य दिनचर्या व आहाराने या जोखिमा निश्चितच टाळता येतात. विशेष म्हणजे वय वाढत असताना, या जोखिमांना टाळण्यासाठी कार्य केले पाहिजे.

हृदयविकारासाठीची पहिली व सर्वात मोठी जोखिम म्हणजे मधूमेह. त्याच्यासोबत उच्चरक्तदाब, लठ्ठपणा, शारीरिक निष्क्रियता या बाबी पर्यायाने येतातच. सोबत रक्तदाब हे केवळ हृदयच नव्हे तर मुत्रपिंड, मेंदू यावर प्रभाव पाडत पायांच्या रक्तवाहिन्यांमध्येही अडथळा निर्माण करतो. हे सगळे जीवनशैलीशी निगडीत विकार आहेत. आहार व व्यायामामुळे या बाबींना टाळता येऊ शकते. आपण जशी आर्थिक गुंतवणूक करतो तर काही वर्षांनी परतावा मिळतो. अगदी त्याच प्रकारे जेव्हा रोज व्यायामाची गुंतवणूक करू तर जीवनात परतावा मिळेल. पण व्यायामाच्या अभावी हृदयरोगाची जोखिम वाढत आहे. मात्र रोज पंधरा मिनिटे व्यायाम केला तरी हृदयविकाराची जोखिम १४ टक्क्यांनी कमी होते.

असे म्हटल्या जाते की, बसणे हे नव्या पिढीचे धुम्रपानच होय. जर आपण सलग खुप वेळ बसून कार्य करीत असू तर आपल्याला एका धुम्रपान करणाऱ्या व्यक्ती एवढाच हृदयरोगाचा धोका असतो. आज तर सलग बसून काम करणे हे आपल्या जीवनशैलीचा भाग झाला आहे. त्यामुळे आता खुर्च्यांवर 'सिटिंग इज इंज्युरियस टू हेल्थ' असे लिहिणे आवश्यक झाले आहे.

व्यायामासंदर्भात काही महत्त्वाच्या बाबी समजून घेणे प्रत्येकाला आवश्यक आहे. कमीत कमी किती व्यायाम करावा, असा प्रश्न नेहमीच हृदयरोग तज्ज्ञांना विचारल्या जातो. आठवड्यातून पाच दिवस कमीत कमी ३० मिनिटं मध्यम तीव्रतेचा (मॉडरेट इंटेंसिटी) व्यायाम करणे अपेक्षित आहे. म्हणजे असा व्यायाम की, जो करतांना व्यक्ती आपल्या भवतालच्या व्यक्तीसोबत बोलू शकतो, त्यास दम लागत नाही. रोज चालणे वा जॉगिंग या व्यायाम प्रकारात मोडते किंवा आठवड्यातून तीन दिवस २५ मिनिटं थोडा तीव्र व्यायाम करणे अपेक्षित आहे. हा व्यायाम करतांना दम लागतो व आपल्या बाजूला असलेल्या व्यक्तीशी बोलणे शक्य नसते. धावणे व जलतरण या व्यायाम प्रकारात मोडतो. शिवाय दोन दिवस वजन उचलून स्वतःच्या क्षमता वाढविण्याचा व्यायाम ज्यास 'वेट ट्रेनिंग' म्हणतात, तो देखील करणे आवश्यक आहे. मात्र व्यायामाचा अतिरेक व्हायला नको.

आहार, जीवनाचा अविभाज्य घटक आहे. हृदयरोगात त्याचे महत्त्व तर अनन्य साधारणच आहे. पण हृदयरोगाचे निदान झाले किंवा हृदयरोग टाळावयाचा असेल तरी आपल्याकडे आहार अचानक बचलविणे शक्य नसते. कारण तो संस्कृती, परिसर, सभौतालच्या वातावरण व लोकांवर अवलंबून असतो. मात्र व्यायामाशी निगडीत काही ठोकताळे अथवा सर्वसाधारण नियम पाळले तरी आहारावर नियंत्रण आणता येईल. त्यापैकी पहिली बाब म्हणजे साखर किंवा साखरजन्य पदार्थांचे सेवन कमी किंबहुना वर्ज्य करणे. हल्ली तर रोजच्या जेवणानंतर 'डेजर्ट' म्हणून गोड खाण्याचे प्रमाण वाढले आहे. हे अयोग्य असून लठ्ठपणा, इन्सुलिन रेजिस्टंस, मधूमेह आणि पर्यायाने हृदयविकारास आमंत्रण दिल्यासारखे आहे. त्यामुळे साखर हा नव्या युगाचा तंबाखूच आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. दुसरं म्हणजे जे काही प्रिजर्व्ह अथवा डबाबंद आहे, ते हृदयासाठी घातकच आहे. त्या बाबी डबाबंद असल्यामुळे ताजे तर मुळीच नसतील. शिवाय टिकवून ठेवण्यासाठी रसायनांचा वापर देखील केल्या गेला असेल. हे रसायनं हृदयासाठी घातक ठरू शकतात. शेवटी आहाराच्या बाबतीत आणखी एक सुत्र लक्षात ठेवायचं की, जो आहार माझ्या आजीला माहित नाही, तो पदार्थ आरोग्यास योग्य नाही. अर्थात मार्केटिंगच्या काळात आजीला माहित असलेले पदार्थ डबाबंद करून विकल्या जात आहेत. मात्र येथे ही डबाबंद पदार्थ टाळले पाहिजेत.

सध्या धावपळीच्या जीवनशैलीमध्ये अनेकजण अपुरी झोप घेतात आणि याचे दुष्परिणाम आपल्या आरोग्यावर दिसून येतात. जेव्हा शरीर थकलेले असते, तेव्हा शरीराला झोपेची आवश्यकता असते. तज्ज्ञांच्या मते झोपेच्या कमतरतेमुळे हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधित आजारांचा धोका वाढू शकतो. झोप ही माणसाच्या आरोग्यासाठी एक महत्त्वाचा घटक आहे. चांगल्या झोपेमुळे तुम्ही नेहमी निरोगी राहता. सध्या धावपळीच्या जीवनशैलीमध्ये अनेकजण अपुरी झोप घेतात आणि याचे दुष्परिणाम आपल्या आरोग्यावर दिसून येतात. जेव्हा शरीर थकलेले असते, तेव्हा शरीराला झोपेची आवश्यकता असते. तज्ज्ञांच्या मते झोपेच्या कमतरतेमुळे हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधित आजारांचा धोका वाढू शकतो. झोप पूर्ण न झाल्यामुळे ऑक्सिडेटिव्ह ताण येऊ शकतो, ज्यामुळे रक्तवाहिन्यांच्या वॉलमध्ये एथेरोस्क्लेरोसिस दिसून येतो. यामुळे हृदयाशी संबंधित समस्या निर्माण होतात. ओएसए सारख्या झोपेच्या आजारांमुळेही अनेकांची झोप नीट होत नाही. या आजारांमध्ये श्वासनलिका वारंवार एकमेकांवर आदळतात, त्यामुळे झोपेत अडथळा निर्माण होतो.

आजच्या धावपळीच्या जगात जेव्हा आपण आपल्या कामाच्या ठिकाणी, घरामध्ये, शाळा इत्यादींमध्ये सतत तणावपूर्ण परिस्थितीला तोंड देत असतो, तेव्हा तणाव सातत्याने असतोच, ज्यामुळे आपल्याला क्रोनिक स्ट्रेस डिसऑर्डर विकसित होऊ शकतो. तणावांमुळे हृदयाचे आजार होतात! हे वाक्य जरी आपण डॉक्टर, मित्र आणि कुटुंबीयांकडून दररोज ऐकले असेल. पण हे जैविक आणि वैद्यकीय संशोधनावर आधारावर सांगितले जाते. तणाव हा चिंता आणि भितीदायक स्थितीमध्ये आपल्या शरिराकडून मिळणारी प्रतिक्रिया आहे. वाघ पाठीमागे लागल्यासारख्या परिस्थितीमध्ये, जेव्हा आपल्या समोर आलेल्या परिस्थतीचा सामना करायचा असतो अशा स्थितीमध्ये आपले शरीर त्वरित प्रतिक्रिया देते. यालाच आपण आल्पकालीन ताण येतो.

भयावह परिस्थिती संपल्यानंतर शरीर आपोआप सामान्य स्थितीत येते. पण आल्पकालीन ताण जात नसेल तर काय करावे? तणावपूर्ण परिस्थितीत आपल्या शरीरात दोन हार्मोन्स कॉर्टिसॉल आणि अॅड्रेनालाईन सोडले जातात. कॉर्टिसॉल तणाव परिस्थितीत साखरेला उर्जेचा स्रोत म्हणून सोडण्यात मदत करते, तर अॅड्रेनालाईन शरीराच्या महत्त्वाच्या अवयवांमध्ये रक्त प्रवाहाला प्राधान्य देण्यासाठी मदत करते. जसे की पायांमधील स्नायू, इतर रक्तवाहिन्या आकुंचन पावते आणि हृदय गती वाढवते ज्यामुळे अतिरिक्त ऑक्सिजनयुक्त रक्त तयार होते आणि ते स्नायूंपर्यंत पोहोचू शकते. रक्तवाहिन्या आकुंचन पावल्यामुळे उच्च रक्तदाब होतो.



प्रविण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९
ई-मेल : pravinbagde@gmail.com

# शासनकर्ती जमात बनने हेच आमचे उद्दिष्ट आणि आकांक्षा आहे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

### फुले, शाहू, आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ६६ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : आपण सर्वांना ज्ञात आहेच की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २४ सप्टेंबर १९४४ ला मद्रास इलाखा शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशनच्या वतीने रावबहादुर एन. शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यांची प्रचंड जाहीर सभा संपन्न झाली होती. त्यात मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, शासनकर्ती जमात बनने हेच आमचे उद्दिष्ट आणि आकांक्षा होय. म्हणून संदर्भीय ऐतिहासिक विधानाच्या ८० व्या वर्धापनदिनानिमित्त सद्यस्थितीवर विचारमंथन व्हावे म्हणून सदरील विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि आल इंडिया नाग असोसिएशन (खछ: आईना) च्या संयुक्त विद्यमाने ६६ व्या वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे २२ सप्टेंबर २०२४ ला फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना अनामी मोरे म्हणाले की, शासनकर्ती जमात बनण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्व संदेशांना नीट समजून घेणे आवश्यक आहे. शिका म्हणजे नेमके काय? शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे, जे प्राशन करील ते गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. असे बाबासाहेब म्हणाले होते. तर मग आज शिकली सवरलेली मंडळी गुरगुरतायत काय?



तसे होत नसेल तर अशा निकृष्ट दर्जाच्या शिक्षणाचा फारसा उपयोग होत नसतो. संघटीत होऊन लढा दिला तर यशस्वी होणे शक्य असताना आपण तसे का करीत नाही? बुद्धीमान माणसांची लेकरे बुद्धीमानच असली पाहिजेत असे अपेक्षित असताना आपले आदर्श डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ज्ञानाचे प्रतीक समजले जात आहे तर आपण अनुयायी म्हणून कुठे आहोत? कार्यकर्त्यांनी झोकून देऊन काम केले पाहिजे हे अपेक्षित असले तरी त्याच्या आर्थिक नियोजनाचे काय? करिता उत्कृष्ट दर्जाच्या शिक्षणाची आवश्यकता आहे. जेणेकरून चळवळीची उपयोगिता समजून घेता येईल. परिणामी शासनकर्ती जमात होणे शक्य होईल.

याप्रसंगी नवाब पटेल यांनी चळवळीच्या यशस्वीतेसाठी सदिच्छा व्यक्त केल्या. अन्वर अली नूर जाफर म्हणाले की, केवळ भाषणकर्ते होऊन शासनकर्ते होता येणार नाही तर भाषणातील वक्तव्यावर प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी लागेल. एकत्रित येऊन आरोग्य समस्या निराकरणासाठी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलस निर्माण करून सहकारी तत्त्वावर चालविली पाहिजेत. लग्न समारंभावरील अवाढव्य खर्च कमी करून विधायक कार्यात सहभागी होऊन आर्थिक हिस्सेदारी प्रदान केली पाहिजे. एक दिवस जयंती साजरी करणारे वर्षभरातील ३६४ दिवस काय करतात? याची तपासणी केली पाहिजे. किमान समान तत्वावर तरी आपण एकत्रित का येत नाहीत? हे करू शकलो तरच आपण या देशाची शासनकर्ती जमात होऊ शकतो. जो मार्केट में सस्ता होता है, वो मेस में पकता है। हे लक्षात घेऊन मार्गक्रमण करू शकलो तर यश आपल्या पाठीशी उभे राहील. महादेव डांबरे म्हणाले की, २४ सप्टेंबरला राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती. याच दिवशी पुणे करार झाला होता. याच दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शासनकर्ती जमात होण्याच्या अनुषंगाने संदेश दिला होता. म्हणून सर्व अडचणी बाजूला सारून महत्त्वपूर्ण मुद्यावर प्राधान्यक्रमाने कार्य केले पाहिजे. गोलमेज परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी विशेष व्यवस्था केली जावी अशी मागणी केली होती. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मी हिंदू म्हणून जन्माला आलो तरी, मी हिंदू म्हणून मरणार नाही. अशी भीमगर्जना केली होती. तर आमचे प्रतिनिधी कवितेत मग्न असतात आणि हिंदू म्हणून मरणार असल्याचे जाहीर वक्तव्य करतात. ही बाब आपल्यासाठी लाजिरवाणी आहे. अहंकार बाजूला ठेवून एमआयएम, वंचित, बीएसपी सारख्या सर्व पक्षांनी एकत्र येऊन मोट बांधली तर राजकीय क्षेत्रात यशस्वी होऊन शासनकर्ती जमात होण्याची स्वप्ने साकार करता येतील.

प्रमुख वक्ते एड. राजू बागूल म्हणाले की, पूर्वी शासकीय नौक-या करने म्हणजे शासनकर्ते असल्यासारखे वाटायचे आता याची जाणीव होत चालली आहे की विधायिकेत जाऊन प्रतिनिधित्वाची भूमिका पार पाडणे म्हणजे शासनकर्ते होण्यासारखे आहे. शासनकर्ती जमात होण्यासाठी आपण आपल्या स्वतःच्या परियायी स्वतंत्र मेडियाची निर्मिती केली पाहिजे, जेणेकरून गोबेल्स नीतिला खोडून काढता येईल. अयोध्या सारख्या खुल्या प्रवर्गातील मतदारसंघातून अवधेशप्रसाद सारखे उमेदवार निवडून येऊ शकतात. तसेच चंद्रशेखर आझाद सारख्या व्यक्ती सुद्धा जिंकू शकतात. हे आपल्यासाठी अभिमानास्पद आहे. ही प्रक्रिया देशभरात राबविण्यात यावी जेणेकरून शासनकर्ती जमात होणे शक्य होईल. ईव्हीएमचे प्राबल्य नष्ट केले तर सत्ता बहुजनांची असेल. करिता आपण सर्वांनी हिरीरीने राजकारणात सहभागी झाले पाहिजे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, प्रथमतः मी त्या वर्तमानपत्राच्या सर्व संपादकाचे व त्यांच्या टीमचे मनपूर्वक आभार व्यक्त करतो, ज्यांनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या बातम्या प्रकाशित केलेल्या आहेत. २४ सप्टेंबर १९४४ ला मद्रास येथे संपन्न झालेल्या सभेत सुरूवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मद्रास आणि द्रविड वर्कर्स असोसिएशन, साऊथ इंडियन बुद्धिष्ट असोसिएशन, शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशन ऑफ दि सिव्हिल एंड मिलिटरी स्टेशन बंगलोर, मद्रास शेड्युल्ड कास्ट्स स्टुडंटस असोसिएशन सह इतर अनेक संस्था मार्फत मानपत्रे देण्यात आली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या भाषणात द्वितीय गोलमेज परिषदेतील एकंदर स्थितीची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला. पहिल्या गोलमेज परिषदेला अनुपस्थित असलेल्या गांधींना काँग्रेसने द्वितीय गोलमेज परिषदेला संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करण्यासाठी पाठविले होते. मात्र त्यांनी सायमन कमिशनच्या शिफारशीवरच समाधान मानले होते. सायमन कमिशनच्या शिफारशी मंजूर करून घेण्यासाठी कॉन्झर्व्हेटीव्ह, लेबर व लिबरल पक्षाचे जे कमिशन स्थापन करण्यात आले होते. त्या समोर सप्रू, जिन्ना व आंबेडकर यांनी आवाज उठविला होता. ज्यामुळे सरकारला नवीन समिती स्थापन करने भाग पडले होते. बाबासाहेब आंबेडकरांनी हे पण स्पष्ट केले होते की, हिंदूस्थानातील व संस्थानिकांतील राजकारणी हे एक़च असले तरी त्यांची विभागणी होऊन १५० वर्षे झाल्याने व त्यांना मिळालेले राजकीय शिक्षण भिन्न असल्याने त्यांची भेसळ करू नये. द्वितीय गोलमेज परिषदेच्या पहिल्या दिवसाच्या कार्यवाहीत गांधीं म्हणाले होते की, माझ्या मनाला डॉ. आंबेडकरांचे म्हणणे पटते पण बुद्धिला पटत नाही. परिणामी दुसऱ्या दिवशी डॉ. आंबेडकरांनी अध्यक्षांच्या अनुमतीने प्रज्येचे प्रतिनिधी संस्थानिकांनीच पसंत करण्यासाठी काँग्रेसच्या वतीने बोलण्याची त्यांना अनुमती मिळाली आहे काय? कॉन्झर्व्हेटीव्ह पार्टीला हव्या असलेल्या निवडणुकांना सर्वांचा विरोध असताना गांधींने ते का मान्य केले आहे? असे प्रश्न गांधींना विचारले होते ज्यांला त्यांनी प्रत्युत्तर दिले नाही. पुढे आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी खास हक्क म्हणजे स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली होती. ज्याला सरकारने पाठिंबा दिला होता. परंतु गांधींने विरोध करून आमरण उपोषणाचे शस्त्र उगारले परिणामी पुणे करार होऊन अस्पृश्यांना मिळालेले स्वतंत्र मतदारसंघ गमवावे लागले. म्हणून बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, जातीय प्रश्न क्षितिजावर दिसू लागल्यापासून आपल्या सार्वजनिक आयुष्यात गांधींनी जर काही केले असेल तर ते अस्पृश्यांकडे दूर्लक्ष करणे हेच होय. या सर्व घडामोडीवर उपाय योजना म्हणून जा आणि आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा की, शासनकर्ती जमात बनने हेच आमचे उद्दिष्ट व आकांक्षा होय. हे आपण जनमानसावर बिंबविले पाहिजे. या अनुषंगाने वर्तमानात आपण कुठे आहोत? काय कमावले आणि काय गमावले? याची जाणीव व्हावी म्हणून जाणीवपूर्वक या विधानाच्या अनुषंगाने चर्चा आयोजित केली आहे.

या कार्यशाळेचे सुत्रसंचालन महादेव डांबरे यांनी केले. या कार्यशाळेला नवाब पटेल, बी. बी. मुजमुले, एड. राजू बागूल, अनामी मोरे, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे महादेव डांबरे यांच्या आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात

### मार्केट यार्डतील दुकान फोडून ३ लाख ६४ हजारांचे साहित्य पळवले

सोलापूर (प्रतिनिधी) मार्केट यार्ड येथील जाजू इंटरप्राईजेस या दुकानातील मागील गोडाऊनच्या शटरचा कडी-कोंयडा कशाने तरी कट करून अज्ञात चोरट्याने दुकानात प्रवेश करत ३ लाख ६४ हजार १५० रुपयांचे साहित्य चोरून नेल्याची घटना २६ ते २७ सप्टेंबर दरम्यान घडली.याप्रकरणी दिनेश जुगलकिशोर जाजू (वय-४१,रा. भवानी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पळसळकर हे करीत आहेत.

### पाण्याचा नळ काढण्यावरून लाथा बुक्क्यांनी मारहाण ; चौघांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) पाण्याचा नळ काढण्याच्या कारणावरून लाथा बुक्क्यांनी मारहाण करत तुम्हाला आज सोडणार नाही,तुम्ही जास्त नाटक करत आहात असे म्हणत शिवीगाळ व दमदाटी करून मारहाण केली.याप्रकरणी सोनाली शुभम व्हटकर (वय-१९,रा.मेहता नगर,दहिटणे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रामदास व्हटकर,पुष्पा रामदास व्हटकर,धीरज रामदास व्हटकर व चंदन रामदास व्हटकर (सर्व.रा.मेहता नगर दहिटणे) यांच्याविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस नाईक वाघमारे हे करीत आहेत.

### कोविड योद्धांच्या कुटुंबियांना मिळणार एक कोटी रुपये

दिल्ली : दिल्ली सरकारने कोविड १९ च्या काळात मृत्यूमुख पडलेल्या पाच करोनो योद्ध्यांच्या प्रत्येक कुटुंबाला १ कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे. मुख्यमंत्री आतिशी यांनी यासंदर्भातील माहिती दिली.

फार्मासिस्ट संजय मनचंदा यांचं कुटुंबिय, मौलाना आझाद मेडिकल कॉलेजमधील कनिष्ठ सहाय्यक रवी कुमार सिंग, स्वच्छता कर्मचारी वीरेंद्र कुमार, दिल्लीचे पोलीस अधिकारी भावनी चंद्रा आणि प्राथमिक शिक्षक मोहम्मद यासेन यांच्या कुटुंबियांना ही मदत मिळणार आहे. या पाचही लोकांनी साथीच्या आजारात जीवाची बाजी लावत सेवा बजावली होती.

जाहीर झालेल्या मदतीमुळे कुटुंबाचं नुकसान भरून निघणार नाही. परंतु, यामुळे ते निदान सन्मानाने जगू शकतील, असं मुख्यमंत्री आतिशी म्हणाल्या.

# पंढरपूर येथे श्री रुक्मिणी नवरात्र संगीत महोत्सवाचे आयोजन

## श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर वतीने श्री रुक्मिणी नवरात्र संगीत महोत्सवात आंतरराष्ट्रीय किर्तीच्या कलाकारांची उपस्थिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांचे वतीने सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके साहेब आणि सर्व सन्माननीय सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या अथक परिश्रमातून प्रतिवर्षाप्रमाणे सुरू असलेल्या श्री.रुक्मिणी नवरात्र संगीत महोत्सव रात्री ७:३० ते १०:०० या वेळेत श्री संत तुकाराम भवन येथे आयोजन करण्यात आले असून शुक्रवार वार ४ ऑक्टोबर शुक्रवार रोजी भारतरत्न पं.भिमसेन जोशी यांचे नातू विराज जोशी यांचे गायन शनिवार ५ ऑक्टोबर रोजी ख्यातनाम गायक पं.शौनक अभिषेकी महोत्सवात यांचा स्वराभिषेक रविवार दिनांक ६ ऑक्टोबर रोजी ओंकार कला अकादमी चेन्नई व अतुल खांडेकर यांचे गायन सोमवार दिनांक ७ ऑक्टोबर रोजी वैष्णवी मगर यांचे अभंगगायन मंगळवार दिनांक ८ ऑक्टोबर रोजी उस्ताद रशीद खान यांचे शिष्य कृष्णा बोंगाणे यांचा दुमदुमली पंढरी बुधवार दिनांक ९ ऑक्टोबर रोजी राम विधाते व बजरंग विधाते बंधू चे गायन तर गुरुवार दिनांक १० ऑक्टोबर रोजी शर्वरी वैद्य मुंबई व धनंजय जोशी नांदेड या ख्यातनाम गायक.गायिकांचा रुक्मिणी नवरात्र संगीत महोत्सवात सहभाग असणार आहे. सर्व कलाकारांना तबला सुभाष कामत.पांडूरंग पवार.तेजोव्रत जोशी.निसर्ग देहूकर.कार्तिक स्वामी.माऊली खरात.हार्मोनिअम उदय कुलकर्णी.लीलाधर चक्रदेव. ओंकार पाठक.माधव लिमये. निवेदन उमेश बागडे.पखवाज ज्ञानेश्वर दुधणे तर टाळ शिवराज पंडीत.अक्षय तळेकर. शरद जाधव.सुत्रसंचलन विक्रम बिस्किटे सर आदी कलाकार करणार आहेत.

यावेळी पंढरपूर व पंढरपूर पंचक्रोशीतील कला रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांचे वतीने करण्यात आले आहे.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व पदाधिकारी अधिकारी आणि कर्मचारी अधिक परिश्रम घेत आहेत.

# मैंदर्गी येथे पिण्याचे पाणी पुरवठा सुरळीत करावे यासाठी ग्रामस्थांच्या वतीने नगरपरिषदेवर धडक मोर्चा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथे पिण्याचे पाण्याचे टंचाई निर्माण झाले आहे. भरपूर पाणी असून देखील मैंदर्गी नगरपरिषदेचे नियोजन नसल्यामुळे जनतेला नाहक त्रास सहन करावा लागतो. नगरपरिषद प्रशासनाने पाणी पुरवठा सुरळीत केला पाहिजे यासंदर्भात मैंर्गीतील नागरीका कडुन कर निरीक्षक भगवत पवार यांना निवेदन देण्यात आले आहे.

याप्रसंगी ,उद्योजक नागण्णा दुर्गी, बसवराज गोब्बुर, नीलकंठ मेंठे काशिनाथ जकापुरे, इस्माईल आळंद, परमेश्वर दुर्गी, कैलास भत्ता, राजकुमार आरेनवरू, व मैंदर्गीतील आदी सह ईतर नागरिक उपस्थित होते.जर या निवेदनाची दखल घेतली नाही तर यापेक्षा तीव्र आंदोलन नागरीकांच्या वतीने करण्याच्या इशारा उपस्थित मंडळी व्यक्त केली आहे.




# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात गानसम्राज्ञी स्व. लतादीदी मंगेशकर यांच्या जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : भारतरत्न, गानसम्राज्ञी स्व.लतादीदी मंगेशकर यांच्या जयंती निमित्त, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पांजलीने अभिवादन करण्यात आले.

स्व.भारतरत्न, गानसम्राज्ञी, लतादिदी मंगेशकर यांचे अन्नछत्राचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराजांवर अगदी पुत्रवत प्रेम होते. त्यांची छत्रपतींच्या घराण्यावर उदंड श्रध्दा होती. त्या वेळोवेळी अन्नछत्रास मदत करीत व सदैव मार्गदर्शन करीत होत्या. स्व.लतादीदीनी त्यांच्या स्वामीगीतांच्या लाखो सिडी अन्नछत्रास मोफत दिल्या आहेत. त्या नेहमी अन्नदानास देणगी देऊन मदत करीत होत्या.

न्यासाच्या परिसरातील शिवसृष्टी व शिवचरित्र धातुशिल्प ही संकल्पना त्यांचीच आहे. तसेच त्यांनी स्वत:च्या महागड्या गाड्या (मर्सिडीज व शोव्हरलेट) जन्मेजयराजे यांना भेट म्हणून दिल्या आहेत. त्यांचा आणि त्यांच्या सर्व परिवारांशी जन्मेजयराजे यांचा नेहमीच सुसंवाद होता. पं. हृदयनाथजी मंगेशकर, उषाताई मंगेशकर, मीनाताई खडीकर, आशाताई भोसले यांचेशी महाराजांची खूप जवळीक आहेत. मीनाताई मंगेशकर - खडीकर लिखीत मोठी तिची सावली ह्या लतादिदींच्या आत्मचरित्रपर ग्रंथामध्ये जन्मेजयराजे भोसले यांचा उल्लेख घरातील माणसे असा केले आहेत. जन्मेजयराजे भोसले महाराज हे अन्नछत्रास येणाऱ्या भक्तांची खूप संवेदनाक्ष आहेत. अन्नछत्रात येणाऱ्या स्वामीभक्त हा स्वामी रूप असून, त्यांच्या रुपात श्री स्वामींचा आशीर्वाद हे अन्नछत्रासाठी तारक आहे अशी स्व.लतादीदिंची श्रद्धा होती. यावेळी न्यासाचे सचिव शामराव मोरे, विश्वस्त संतोष भोसले, मनोज निकम, सिध्दाराम कल्याणी, शावरेप्पा माणकोजी, बाळासाहेब पोळ, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, बाळासाहेब घाडगे, अभियंता अमित थोरात, रोहन शिर्के, योगेश कटारे, चंद्रकांत हिबारे, निखील पाटील, गोटू माने, प्रविण घाडगे, दत्ता माने, मल्लिनाथ कोगनुर, प्रकाश पांढरे, काशिनाथ वाले, शिवू स्वामी, महांतेश स्वामी, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# शोभेच्या दारु विक्री तात्पुरते परवान्यासाठी १४ ऑक्टोबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर(जिमा.का):-जिल्हयात (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) सन २०२४ दिपावली सणाकरीता शोभेच्या दारु विक्रीचे (फटाके विक्रीचे) तात्पुरते परवाने वितरीत करण्यात येणार आहेत. तात्पुरत्या परवान्यासाठी विहित नमून्यातील (एलई- ५) अर्ज जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सात रस्ता, शासकीय दुध डेअरी शेजारी,सोलापूर येथे उपलब्ध असल्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पत्रकान्वये कळविले आहे.

अर्जातील माहिती पूर्णपणे भरुन त्यासोबत अर्जदाराचे दोन फोटो, ग्रामपंचायत / नगरपालिका / नगरपरिषद यांचेकडील विहीत मृद्दयांबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र, १८ वर्ष पूर्ण झालेबाबतचा वयाचा पुरावा (एल. सी./जन्मदाखला) संबंधित जागेचे ७/१२ किंवा मिळकत उतारा व नकाशा जागेबाबत स्थानिक प्राधिकरणाचे संमतीपत्र स्वंयघोषणापत्र आदी आवश्यक असलेली कागदपत्रे जोडावीत.

अर्जांच्या चौकशीअंती रु.६००/- चलनाने भरलेले परवाना फी तसेच यापूर्वी काढण्यात आलेल्या परवान्याची प्रत इत्यादीसह परीपूर्ण अर्ज दिनांक २९ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर २०२४ (सुट्टीचे दिवस वगळून) रोजीपर्यंत सादर करावेत, परवाने देणेपूर्वी पोलीस विभागाकडून चौकशी अहवाल प्राप्त होणे आवश्यक असल्याने दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच सदर काम काजाच्या कोणत्याही टप्प्यावर मा. शासनाकडील व मा.न्यायालयाकडील प्राप्त निर्देश,अटी व शर्ती हे तात्पुरते परवानाधारक/अर्जदार यांचेवर बंधनकारक राहतील. मा.शासनाच्या व मा.न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे परवाने देणेबाबत परवाना प्राधिकारी हे अंतिम निर्णय घेतील.

परवान्याबाबत अधिक माहितीसाठी गृह शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सात रस्ता, शासकीय दुध डेअरी शेजारी सोलापूर येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हादंडाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.



# स्वेरीचे तंत्रशिक्षणाबरोबरच क्रीडा क्षेत्रात देखील यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरी तथा श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट ही संस्था शिक्षणात विविध प्रयोग राबवून विद्यार्थ्यांना गुणवत्तेला अधिक परिपक्व बनवत आहे हे सर्वश्रुत आहे. आता स्वेरी ही तंत्रशिक्षणाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही आपला दबदबा निर्माण करत आहे. हे मागील काही वर्षांपासून विविध क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून दिसून येत आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत बेलाटी येथील बी.एम.आय.टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये आयोजिलेल्या विद्यापीठस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेमध्ये स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागात द्वितीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या नेहा सुरेश झिरपे यांनी ७० मुलींमधून तृतीय क्रमांक पटकावला. साऊथ झोनसाठी होणाऱ्या स्पर्धेसाठी नेहा झिरपे आता पात्र ठरल्या आहेत. तसेच त्यांना क्रीडा महोत्सवामध्ये सुद्धा सहभाग होण्याची संधी मिळाली आहे. या विजयामुळे डिसेंबर २०२४ मध्ये गडचिरोली येथे होणाऱ्या आंतरविद्यापीठ स्तरीय स्पर्धेसाठी नेहा झिरपे यांची निवड झाली आहे. स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांची खेळासाठी सर्व विद्यार्थ्यांना सुरुवातीपासूनच सातत्याने प्रेरणा मिळत आहे, याचाही फायदा झिरपे यांना झाला. शिक्षणाबरोबरच झिरपे यांनी खेळाकडे लक्ष देवून, परिश्रम केले आणि यशाला गवसणी घातली. झिरपे यांना क्रीडा प्रशिक्षक दीपक भोसले व मार्गदर्शक प्रा.संजय मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम राहावे यासाठी स्वेरीमध्ये शिक्षणाबरोबरच नियमित योगा करून घेतला जातो स्वेरीमध्ये अत्याधुनिक सुविधा असलेल्या स्वतंत्र जिमची देखील सोय आहे, याचा विद्यार्थ्यांना नेहमीच फायदा होतो. सांघिक बुद्धिबळ स्पर्धेमध्ये सिव्हिल इंजिनिअरिंग विभागात दुसऱ्या वर्षात शिक्षण घेणाऱ्या सई प्रमोद मोरे व प्रियांका धनाजी चव्हाण व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागात दुसऱ्या वर्षात शिक्षण घेणाऱ्या जुई अमोल गवसाने यांनी देखील दहा संघांमध्ये तृतीय क्रमांक पटकावल्यामुळे त्या आंतरविद्यापीठ स्तरांमध्ये सहभागी होणार आहेत. बुद्धिबळ स्पर्धेत यशस्वी झाल्यामुळे स्वेरीच्या वतीने नेहा झिरपे, सई मोरे, प्रियांका चव्हाण व जुई गवसाने यांचा स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी. रोंगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यशस्वी स्पर्धकांचे स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरी मध्ये असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी व पालकांनी अभिनंदन केले.

> **स्वेरीच्या नेहा झिरपे या बुद्धिबळ स्पर्धेत तृतीय**

**कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या१३७ व्या जयंती समारंभ**

**सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे**

# महाराष्ट्राच्या जडणघडणीत रयत शिक्षण संस्थेचा महत्वाचा वाटा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : रयत शिक्षण संस्था ही पुरोगामी विचारांची संस्था असून पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील ही महापुरुषांनी महाराष्ट्राला दिलेली फार मोठी देणगी आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावर राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विचार आणि कार्याचा फार मोठा प्रभाव होता. महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या सत्यशोधकीय चळवळीतून रयत शिक्षण संस्थेचा जन्म झालेला आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या वैचारिक जडणघडणीमध्ये रयत शिक्षण संस्थेचा फार मोठा आणि महत्त्वाचा वाटा आहे. असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे यांनी केले.

येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालय आणि यशवंत विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या१३७ व्या जयंती समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव ऑडिटर प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य अभिजीतआबा पाटील, सुनेत्राताई पवार, बाळासाहेब पाटील वरवडे, बाळासाहेब पाटील रोपळे, रयतच्या लाईफ मेंबर बोर्डाचे सदस्य संदीप भुजबळ डॉ. राजेंद्र जाधव, सेवानिवृत्त प्राचार्य डी. जे. साळुंखे, नारायण गायकवाड रोपळे, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, उपप्राचार्य डॉ. तुकाराम अनंतकवळस, उपप्राचार्य प्रा. राजेश कवडे, अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, अधिष्ठाता डॉ. अनिल चोपडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रमेश शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

> **प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे पुढे म्हणाले की, महात्मा ज्योतिराव फुले सावित्रीबाई फुले यांनी बहुजन समाजाच्या उद्धाराचे जे कार्य केले, त्यांनी आपल्या कार्यातून बहुजनांच्या मनात ज्ञानाची लालसा निर्माण केली. यातूनच बहुजन समाजाला शिक्षण देण्याची प्रेरणा कर्मवीर भाऊराव पाटील यांना मिळाली. देशांमध्ये पुढारलेल्या महाराष्ट्राचे जे चित्र निर्माण झालेले आहे; त्याच्या मुळाशी महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांनी घेतलेले श्रम आणि त्यांनी केलेला संघर्ष त्याच्या मुळाशी आहे. जोपर्यंत आपण फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा समजून घेणार नाहीत. तोपर्यंत आपणास कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केलेल्या शैक्षणिक कार्याची उंची कळणार नाही. कर्मवीरांनी 'कमवा आणि शिका' हा मूलमंत्र समाजाला दिला. यातून श्रमप्रतिष्ठा, सुसंस्कार, स्वाध्याय, स्वाभिमान यांची जपणूक मोठ्या प्रमाणात झाली. म्हणूनच आज महाराष्ट्र सर्व बाबतीत आपणास सुधारलेला दिसतो. महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाचा पाया घातला त्यामुळेच देशाच्या विविध क्षेत्रात महिलांचे नेतृत्व सक्षमपणाने पुढे येताना दिसते. शाहू महाराजांनी सामाजिक समतेचा विचार तळागाळापर्यंत पोहोचवला.**

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे म्हणाले की, सध्या शिक्षण व्यवस्था अतिशय गतीने बदलत आहे. मोबाईल आणि तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात शिरकाव या व्यवस्थेमध्ये झालेला आहे. विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी अध्ययन अध्यापन प्रक्रिया सुकर होण्यासाठी मोबाईल आणि तंत्रज्ञानाचा खुबीने वापर करावा. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी लावलेल्या फांदीचा आज वटवृक्ष झालेला दिसतो. 'कमवा आणि शिका' या योजनेतून अनेक विद्यार्थी घडले आहेत. रयत शिक्षण संस्था ही समाजाच्या मदतीवर उभारलेली संस्था आहे. अज्ञान आणि दारिद्र्याच्या विरोधात ही संस्था लढते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर चंद्रकांत खिलारे यांनी केले. तर मान्यवरांचा परिचय डॉ. रमेश शिंदे यांनी करून दिला.



कार्यक्रमाच्या प्रारंभी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्यास मान्यवरांनी आदरांजली अर्पण केली. विद्यार्थ्यांनी बनवलेल्या १०८ प्रतिकृती आणि आर्टिफॅक्टचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात शैक्षणिक क्षेत्रात नावलौकिक मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थी आणि शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात रयत शिक्षण संस्थेचे सेवानिवृत्त सेवक प्राध्यापक वाय. एन. माने यांनी एक लक्ष रुपयाचा धनादेश देणगी म्हणून संस्था पदाधिकाऱ्यांकडे सुपूर्द केला; त्यानिमित्ताने त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास सीनियर ज्युनियर वोकेशनल विभागातील सर्व विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर सेवक सेवानिवृत्त रयत सेवक पालक पत्रकार बहुसंख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी एनसीसी विभागाच्या कॅडेटने मान्यवरांना गार्ड ऑफ ऑनर दिला. याचे नियोजन कॅप्टन डॉ. समाधान माने यांनी केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमर कांबळे व प्रा. सारिका भांगे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यालयीन प्रमुख अमोल जगदाळे सागर नखाते, अभिजीत जाधव, अमोल माने, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, सांस्कृतिक विभागाचे सर्व सदस्य यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी उपस्थितांचे आभार मुख्याध्यापिका अनिता साळवे यांनी मानले.